# बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम- (C-31)
# स्वाध्याय व प्रात्यक्षिक प्रश्न २०१३

## अभ्यासक्रम १) बालविकासाची मुलतत्त्वे बालविकास व बालमानसशास्त्र (EDU-131)

१) बालविकासाची कोणतीही ५ अंगे स्पष्टीकरणासह लिहा. (५ गुण)

२) ताराबाई मोडकांची बालशिक्षणाबाबतची मते लिहा. (१० गुण)

३) स्मरण म्हणजे काय? ते सांगुन स्मरणाचे चार टप्पे उदाहरणासह लिहा. (५ गुण)

४) बालकाच्या भावनात्मक जीवनाची कोणतीही वैशिष्टये लिहा. (५ गुण)

## अभ्यासक्रम २) बालशिक्षण : बालआहार व आरोग्य (EDU-132)

१) आरोग्य म्हणजे काय ते सांगून बालकाच्या आरोग्याच्या पोषक बाबी कोणत्या ते स्पष्ट करा. (५ गुण)

२) शाळेच्या मधल्या वेळेत बालकांना पौष्टिक अन्न देण्याच्या दृष्टिने वर्षभर उपलब्ध असणारे विविध पदार्थ कसे देता येईल, त्याचे नियोजन कसे कराल ते लिहा. (१० गुण)

३) बालकांच्या आहारासंबंधी चांगल्या सवयी कोणते? त्या आजारापैकी कोणत्याही एका आजाराची उपाययोजना सुचवा. (५ गुण)

४) बालकांना होणारे किरकोळ आजार कोणते? त्या आजारापैकी कोणत्याही एका आजाराची उपाययोजना सुचवा. (५ गुण)

## अभ्यासक्रम ३) बालशिक्षण कार्यपध्दती (EDU-133)

प्र १ ला. बालकाच्या स्थूल आणि सूक्ष्म स्नायु विकासाच्या दृष्टीने तुम्ही स्वतः कोणकोणते घ्याल. उपक्रम व त्यातून कोणते हेतू साध्य होतील. (५ गुण)

प्र २ रा. बालकांच्या भावनिक विकासासाठी कोणत्या कृती तुम्ही त्यांच्या कडुन करुन घ्याल ते स्पष्ट करा. (५ गुण)

प्र ३ रा. मुक्त खेळांत बालसेविकेची भूमिका स्पष्ट करा. (५ गुण)

प्र ४ था. जीवन व्यवहार कामाचे प्रकार लिहून त्यांची माहिती लिहा. (१० गुण)

## ४) बालशिक्षणाचे व्यवस्थापन व मूल्यमापन (EDU-134)

१) संघटन हा व्यवस्थापनाचा कणा या वाक्याशी तुम्ही सहमत आहात का? चर्चा करा. (५ गुण)

२) बालवाडीत बालकांसदर्भात कोणकोणत्या प्रकारच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे असे तुम्हास वाटते त्या घटकांची चर्चा करा. (५ गुण)

३) साप्ताहिक नियोजनाचे महत्त्व सांगून बालवाडीतील कोणत्याही एका विषयासाठी साप्ताहिक नियोजन तयार करा. (१० गुण)

४) बालवाडीत उपयुक्त पडणारी मुल्यमापनाची विविध साधने कोणती? त्यांची चर्चा करा. (५ गुण)